RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक २६(६)] शुक्रवार, जुलै १०, २०२६/आषाढ १९, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१० जुलै, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LVIII OF 2026.**

A BILL

TO PREVENT, PROHIBIT AND REDRESS MEDICAL DISCRIMINATION AT WORKPLACE IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८.**

**महाराष्ट्र राज्यात कार्यस्थळी वैद्यकीय भेदभावास प्रतिबंध, मनाई व निवारण करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्यातील खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना गंभीर किंवा दीर्घकालीन आजारांच्या सक्रिय उपचारादरम्यान कार्यस्थळी भेदभाव होत असणे, आणि

**ज्याअर्थी,** अन्यायकारक सेवासमाप्ती, जबरदस्तीने राजीनामा, वाजवी सवलतींचा खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा नकार व सूडभावनेपासून संरक्षण देण्यासाठी, आणि

**ज्याअर्थी,** कार्यस्थळी वैद्यकीय भेदभावास प्रतिबंध, मनाई व प्रभावी निवारणासाठी, आणि

**ज्याअर्थी,** लैंगिक छळ प्रतिबंध कायद्याच्या धर्तीवर अंतर्गत व स्थानिक वैद्यकीय भेदभाव समित्या स्थापन करण्यासाठी, आणि

**ज्याअर्थी,** वेळबद्ध, गोपनीय व निष्पक्ष चौकशी यंत्रणा निर्माण करण्यासाठी, आणि

**त्याअर्थी,** महाराष्ट्रातील विद्यमान कामगार कायद्यांमधील प्रणालीगत त्रुटी दूर करण्यासाठी भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याव्दारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे;

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र कार्यस्थळी वैद्यकीय भेदभाव (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०२६ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो राज्य शासन, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर, -

(अ) "**सक्रिय वैद्यकीय उपचार**" म्हणजे नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकाने प्रमाणित केलेला असा कालावधी, ज्यामध्ये कर्मचारी कर्करोगासारख्या गंभीर आजारासाठी केमोथेरपी, रेडिओथेरपी, शस्त्रक्रिया, दीर्घकालीन औषधोपचार, रुग्णालयात दाखल असणे किंवा तत्सम उपचार घेत आहे;

(ब) "**कर्मचारी**", "**नियोक्ता**" व "**कार्यस्थळ**" या संज्ञांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगार व सेवा अटी) अधिनियम, २०१७ तसेच लागू असलेल्या केंद्रीय कामगार कायद्यांनुसार अर्थ लागू होतील;

(क) "**वैद्यकीय भेदभाव**" म्हणजे केवळ किंवा प्रामुख्याने कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय स्थितीच्या आधारे करण्यात आलेली कोणतीही प्रतिकूल कारवाई, ज्यामध्ये सेवासमाप्ती, जबरदस्तीने राजीनामा, पदोन्नती नाकारणे, रजा नाकारणे, वेतन कपात, बदली, छळ, मानसिक दबाव किंवा बदनामी यांचा समावेश होईल;

(ड) "**वैद्यकीय स्थिती**" म्हणजे कर्करोग, अवयव निकामी होणे, स्वयंप्रतिकारक आजार, क्षयरोग, एचआयव्ही/एड्स, दीर्घकालीन मूत्रपिंड विकार, न्यूरोलॉजिकल आजार किंवा राज्य सरकारने अधिसूचित केलेले इतर गंभीर किंवा दीर्घकालीन आजार;

(ई) "**वाजवी सवलत**" म्हणजे कर्मचाऱ्यास सन्मानाने रोजगार सुरू ठेवता यावा यासाठी आवश्यक व योग्य बदल जसे की रजा, कामाचे तास समायोजन, घरून काम-जे नियोक्त्यावर अतिप्रमाणात आर्थिक किंवा प्रशासकीय ओझे टाकत नाहीत;

(फ) "**अंतर्गत वैद्यकीय भेदभाव समिती**" म्हणजे कलम ६ अंतर्गत स्थापन केलेली समिती.

वैद्यकीय भेदभावास प्रतिबंध.

**३.** कोणताही खासगी नियोक्ता कोणत्याही कर्मचाऱ्याविरुद्ध केवळ वैद्यकीय स्थितीच्या आधारे थेट किंवा अप्रत्यक्ष भेदभाव करणार नाही

सेवाविषयक संरक्षण.

**४.** (अ) सेवेतून काढून टाकणे, जबरदस्तीने राजीनामा देण्यास भाग पाडणे, पदावनती किंवा प्रतिकूल सेवा अटी लादणे, वाजवी सवलत नाकारणे, हे करता येणार नाही.

(ब) अशी कोणतीही कारवाई केवळ वैद्यकीय स्थितीशी पूर्णतः असंबंधित असल्याचे अंतर्गत वैद्यकीय भेदभाव समितीच्या पूर्व लेखी शिफारशीशिवाय करता येणार नाही.

(क) सक्रिय उपचार काळात झालेल्या सेवासमाप्तीच्या बाबतीत, ती वैद्यकीय कारणांशी संबंधित नाही हे सिद्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी नियोक्त्यावर राहील.

**५.** दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक खासगी आस्थापनात अंतर्गत वैद्यकीय भेदभाव समिती स्थापन करणे जिल्हा कामगार अधिकारी यांचेवर बंधनकारक राहील. वैद्यकीय भेदभाव समिती.

**६.** समितीमध्ये अध्यक्ष, दोन वरीष्ठ कर्मचारी सदस्य, आरोग्य / कामगार हक्क क्षेत्रातील एक बाह्य सदस्य, एक वैद्यकीय किंवा व्यावसायिक आरोग्य तज्ज्ञ असतील. परंतु, सदर समितीमध्ये किमान ५०% सदस्य महिला असतील. समितीची रचना.

**७.** पीडित कर्मचारी कथित भेदभावाच्या घटनेपासून ९० दिवसांत उक्त समितीकडे लेखी तक्रार सादर करू शकतो. तक्रार व चौकशी.

**८.** (अ) समिती तक्रार प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करील. वैद्यकीय खर्चाची वसुली.

(ब) सदर चौकशी गोपनीय, निष्पक्ष व मानवी दृष्टिकोनातून केली जाईल.

(क) सदर चौकशी दरम्यान समिती तक्रारकर्त्यास अंतरिम संरक्षण देऊ शकते.

**९.** समितीचा चौकशी अहवाल १० दिवसांत नियोक्त्याकडे सादर केला जाईल व नियोक्त्याने ३० दिवसांत अहवालातील शिफारशींवर अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. चौकशी अहवाल.

**१०.** (अ) कायद्याची माहिती कार्यस्थळी प्रदर्शित करणे नियोक्त्याची कर्तव्ये.

(ब) कर्मचाऱ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे

(क) वैद्यकीय गोपनीयता राखणे

(ड) सूडभावना टाळणे.

**११.** (अ) या अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या नियोक्त्यास प्रथम दोषसिद्धी झाल्यास पंधरा लाख रुपयांपर्यंत द्रव्यदंडाची शिक्षा होईल. शिक्षा.

(ब) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या दोषसिद्धीच्या बाबतीत वीस लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(क) पुनरावृत्ती झाल्यास, लागू असलेल्या कायद्यांनुसार संबंधित आस्थापनेची नोंदणी, परवाना अथवा शासकीय कंत्राट रद्द करण्याबाबत सक्षम प्राधिकरण आवश्यक ती कारवाई करू शकेल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्रातील खासगी क्षेत्रात गंभीर आजारांवर उपचार घेत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवासमाप्ती, बदनामी, रोजगारातून बाहेर काढणे यांचा सामना करावा लागत आहे. सक्रिय कर्करोग उपचारादरम्यान झालेली अन्यायकारक सेवासमाप्ती ही घटना विद्यमान कामगार कायद्यांतील संरचनात्मक अपयश अधोरेखित करते. हा कायदा मानवी हक्क, सन्मान, समानता व जीवनाचा अधिकार यांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे.

वरील उद्दीष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ०२ जुलै, २०२६.

**कैलास घाडगे-पाटील,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १० जुलै, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.